प्रस्तावना
विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती

भारताच्या संविधानातील अनुच्छेद ३३५ मध्ये "संघराज्य किंवा राज्य" यांच्या कारभाराच्या संबंधातील सेवांमध्ये व पदांवर नियुक्ती करताना अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यामधील व्यक्तींचे हक्क प्रशासनाची कार्यक्षमता राखण्याशी सुसंगत असेल अशा रीतीने विचारात घेतले जातील आणि अनुच्छेद १६(१) मध्ये राज्याच्या अखत्यारीतील सेवायोजन किंवा कोणत्याही पदावरील नियुक्ती यासंबंधीच्या बाबींमध्ये सर्व नागरिकांस समान संधी असेल अशी तरतूद आहे. असे असले तरी संविधानाच्या अनुच्छेद १६(४) मध्ये कोणत्याही गोष्टीमुळे, राज्याच्या सेवांमध्ये नागरिकांपैकी ज्या कोणत्याही मागसवर्गाला राज्याच्या मते पर्याप्त प्रतिनिधीत्व नाही अशा वर्गाकरता नियुक्ती किंवा पदे राखून ठेवण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही अशी देखील स्पष्ट तरतूद आहे.

संविधानातील वरील तरतुदी आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांच्या सर्वांगिण विकासाबाबत शासनाने ज्या सोयी सवलती उपलब्ध केलेल्या आहेत, त्या प्रत्यक्षात त्यांना मिळतात किंवा नाही याची पाहणी करण्यासाठी तसेच त्या वर्गाच्या कल्याणाच्या दृष्टीने उपाययोजना सुचविण्यासाठी लोकसभेने व इतर काही राज्यांच्या विधिमंडळानी निर्मित केलेल्या संसदीय समितीच्या धर्तीवर महाराष्ट्र विधिमंडळातही अशी समिती स्थापन करण्याचा प्रश्न विचाराधीन होता. त्यानुसार दिनांक ३० एप्रिल १९७१ रोजी विधानसभेत आणि दिनांक ४ मे १९७१ रोजी विधानपरिषदेत एक प्रस्ताव पारित करण्यात येऊन महाराष्ट्र राज्यात दिनांक ६ मे १९७१ रोजी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती कल्याण समितीची निर्मिती करण्यात आली.

सदर समितीच्या कार्यकक्षेत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांच्यावर होत असलेले अन्याय, अत्याचार व त्यासंबंधी करवयाच्या प्रयत्नांची मिमांसा तसेच या जाती जमातीकरिता कल्याणकारी योजनांचा विचार, त्यांच्या शैक्षणिक विकासाचा प्रश्न, त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी अर्थसंकल्पात करावयाच्या तरतुदी, त्यांना सरकारी, निमसरकारी, सार्वजनिक उपक्रम, वैधानिक मंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी अनुदानावर चालणाऱ्या इतर संस्था यात शासनाने ठरवून दिलेल्या टक्केवारीप्रमाणे जागांचे आरक्षण, पदोन्नतीसंबंधीचे त्यांचे प्रश्न इत्यादी बाबी आणण्यात आल्या, मे, १९७१ मध्ये अस्तित्वात आलेल्या या समितीच्या कार्यकक्षेत विमुक्त जाती व भटक्या जमातींचा जरी अंतर्भाव असला तरी या समितीच्या नावावरुन तसा स्पष्ट बोध होत नव्हता. त्यामुळे सन १९७३ मध्ये दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या प्रस्तावानुसार सदरहू समितीचे नाव " अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती" असे करण्यात आले.

सन १९७९ पर्यंत सदर समिती कार्यरत होती. परंतु अनुसूचित जमातीच्या व्यक्तींच्या विकासासाठी स्वतंत्र समितीची आवश्यकता वाटल्यामुळे दिनांक ११ ऑगस्ट १९७९ रोजी "अनुसूचित जमाती कल्याण समिती" अशी स्वतंत्र समिती गठीत करण्यात आली. त्यानंतर सन १९८१ मध्ये अनुसूचित जाती आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या विकासासाठी स्वतंत्र समित्या निर्माण करण्याची आवश्यकता वाटल्यामुळे विधानसभा व विधानपरिषद नियमात योग्य तो बदल करण्यात येऊन, दिनांक ८ मे १९८१ रोजी "अनुसूचित जाती कल्याण समिती" आणि दिनांक २३ जुलै १९८१ रोजी "विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती" अशा दोन स्वतंत्र समित्या गठीत करण्यात आल्या.विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती

..२/-

स्वतंत्रपणे गठीत केली त्यावेळी समितीची सदस्य संख्या ७ होती . (५ विधानसभा सदस्य व २ विधानपरिषद सदस्य) तथापि माहे मार्च, २००९ मध्ये विधानसभा व विधानपरिषद नियंमामध्ये बदल करण्यात आला व त्यानुसार विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीची सदस्य संख्या ७ ऐवजी १५ करण्यात आली (११ विधानसभा सदस्य व ४ विधानपरिषद सदस्य).

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीची रचना

(विधानसभा नियम २३७ (१) व विधानपरिषद नियम २१४)

दरवर्षी विधानसभेच्या प्रथम अधिवेशनाच्या प्रारंभानंतर किंवा यथास्थिती सार्वत्रिक निवडणुकीनंतर अस्तित्वात आलेल्या विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर शक्य तितक्या लवकर "विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती" नामनिर्देशनाव्दारे घटित करण्यात येते. या समितीत एकूण १५ सदस्य असतील. त्यापैकी ११ सदस्य माननीय अध्यक्ष, विधानसभेच्या सदस्यांतून नामनिर्देशित करतात तर ४ सदस्य मा. सभापती विधानपरिषदेच्या सदस्यांमधून नामनिर्देशित करतात.

या समितीचे सदस्य नवीन समितीची रचना होईपर्यंत पद धारण करतील. सर्वसाधारणपणे हा कालावधी एक वर्षाचा असतो.

समितीची कामे (विधानसभा नियम २३८)

(एक) विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या कल्याणासाठी असलेल्या राज्य शासनाच्या विविध योजनांचे परिक्षण करुन त्याबाबतचा अहवाल दोन्ही सभागृहांना सादर करणे.

(दोन) राज्य शासनाच्या सेवेत शासनाच्या नियंत्रणाखालील पदांवर सरकारी क्षेत्रातील उपक्रम, संविधानिक आणि निमशासकीय संस्था यांतील नेमणुका धरुन विमुक्त जाती व भटक्या जमाती यांना योग्य ते प्रतिनिधित्व मिळवून देण्याकरिता शासनाने केलेल्या उपाययोजनांचे परीक्षण करणे.

(तीन) राज्य शासनाच्या कक्षेत येणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या कल्याणासंबंधातील सर्व बाबींवर सर्वसाधारण विचारविनिमय करुन त्याबाबत दोन्ही सभागृहांना अहवाल सादर करणे.

(चार) समितीने सुचविलेल्या उपाययोजनांबाबत राज्य शासनाने केलेल्या कार्यवाहीविषयी दोन्ही सभागृहांना अवगत करणे.

(पाच) सभागृहाने किंवा मा. अध्यक्षांनी समितीकडे विशेष करुन निर्दिष्ट केलेल्या बाबींचे परीक्षण करणे.

समितीला आवश्यक असलेली सर्व माहिती संबंधित विभागामार्फत उपलब्ध करुन घेतली जाते. सर्वसाधारणपणे समितीच्या प्रारंभिक बैठकीमध्ये अथवा त्यानंतर होणाऱ्या बैठकीमध्ये समितीसमोर असलेल्या कामकाजाचा आढावा घेण्यात येतो व त्या आधारे कोणते विषय अग्रक्रमाने विचारात घेऊन कामकाज करावयाचे याबाबतचा निर्णय समितीमध्ये सर्वानुमते घेतला जातो. त्यानुसार वर्षभरात समिती आपले कामकाज करुन त्याबाबतचे आपले अहवाल सभागृहाला सादर करीत असते.

समितीने तिच्या स्थापनेपासून आजतागायत ४७ अहवाल दोन्ही सभागृहांना सादर केले आहेत.

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने आतापर्यंत सभागृहास सादर केलेल्या काही अहवालातील महत्वाच्या शिफारशींची माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या अहवालातील महत्वाच्या शिफारशी
(दहावी विधानसभा)

अ.क्र.	समितीच्या अहवालाचे वर्ष व अहवाल क्र.	शिफारशींचा सारांश
१	पहिला अहवाल (२०००-२००१)	आश्रमशाळांच्या परिसरातच मुख्याध्यापकांची व अधिक्षकांची निवासाची व्यवस्था होणे गरजेचे आहे. तसेच रात्रीचे वेळी मुलांच्या संरक्षणाच्या दृष्टीने व त्यांच्यावर देखरेख ठेवण्यासाठी प्रत्येक आश्रमशाळेत चौकीदाराचीही आवश्यकता आहे.या सर्व बाबींचा निवासी व शाळा विभागासाठी इमारतींचा आरखडा तयार करीत असताना विचार झाला पाहिजे. परंतु हे होत नसल्यामुळे आश्रमशाळांना परवानगी देण्यासाठी शासनाने इमारतींच्या बाबत जे निकष ठरविले आहेत त्यांचे उल्लंघन बऱ्याच ठिकाणी झाले आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. या परिस्थितीत सुधारणा होण्यासाठी आश्रमशाळा व वसतीगृह यासाठी "एक नमुनेदार आराखडा " (मॉडेल प्लॅन) शासनाने तयार करावा. अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. सदर आराखड्यात आश्रमशाळांच्या शाळा व वसतीगृह विभागासाठी स्वतंत्र इमारती,शाळा व वसतीगृहे विभागात मुलांसाठी सूर्यप्रकाश,वायुविजनाची व्यवस्था,विजेची व पाण्याची पुरेशी व्यवस्था,गोदाम,स्वयंपाक घर व जेवणाचा हॉल, मुख्याध्यापक/अधिक्षकांची तसेच चौकीदारांची निवासाची व्यवस्था,इमारतीला लागून मुले व मुलींसाठी स्वतंत्र संडास व बाथरुम व्यवस्था, सांडपाण्याचा निचरा व्यवस्थितरित्या होण्यासाठी गटार/नाली,मुलांना खेळासाठी मैदान व इतर सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी पुरेशी जागा इत्यादि विविध बाबींचा विचार निवासी व शाळा इमारतींचा आराखडा तयार करीत असताना करण्यात यावा. या प्रकरणी राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयाची माहिती समितीस सहा महिन्याच्या कालावधीत देण्यात यावी.

..२/-

अ.क्र.	समितीच्या अहवालाचे वर्ष व अहवाल क्र.	शिफारशींचा सारांश
३	चौथा अहवाल (२००२-२००३)	वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाच्या भाग भांडवलामध्ये भरीव वाढ करण्यात यावी. व प्रलंबित प्रस्तावर तातडीने निर्णय घेऊन समितीला तीन महिन्याच्या आत कळविण्यात यावे. तसेच या महामंडळाला केंद्रशासनाकडून अनुदान मिळविण्याबाबत प्रयत्न करावेत, अशी समितीची शिफारस आहे.
४	पाचवा अहवाल (२००२-२००३)	१)विमुक्त जाती व भटक्या जमातीचा समूह ज्या तांडे व वस्त्यावर रहातो ती जागा अतिशय अस्वच्छ, गैरसोयीची अशी असते त्यासाठी या वस्त्यामध्ये सुधारणा करण्याची नितांत आवश्यकता समितीला वाटते तांडे व वाडया आणि त्या मधील रस्त्यांचा विकास या योजनांसाठी सन २००३ च्या आत या वर्षापासून नवीन योजना राबविण्यात येत असून या योजनासाठी शासनाने रुपये १.५ कोटीची तरतूद केली आहे. राज्यातील तांडयातील व वस्त्यामधील लोकांकडे पाहाता ही तरतूद देखील अत्यंत अपुरी वाटते तथापि योजनांची सुरुवात झाल्यानंतर जसजसी व्याप्ती वाढेल तसतशी शासनाने तरतूद वाढवावी आणि तांडे, वाडयामध्ये मुलभूत सोयी सुविधा निर्माण करण्याबाबत तसेच अत्यंत दुर्गम व अतिशय मागासलेल्या भागाला सर्व प्रथम प्राधान्याने सुविधा निर्माण करण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे.

समितीच्या अहवालातील महत्वाच्या शिफारशी
(अकरावी विधानसभा)

अ.क्र	समितीच्या अहवालाचे वर्षे व अहवाल क्र.	शिफारशीचा सारांश
५	**पहिला अहवाल (सन २००५-२००६)**	अ) उमेदवाराने नियुक्तीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे जात पडताळणी समितीकडे पाठवावी व यापुढे वृत्तपत्रातून भरतीसंबंधीची जाहिरात देताना जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे अपरिहार्य असल्याचा उल्लेख करावा जेणेकरुन बोगस जात प्रमाणपत्र देऊन नोकरी मिळविण्याच्या प्रवृत्तीला आळा बसेल अशी समितीची शिफारस आहे. ब) सामान्य प्रशासन विभाग,सामाजिक न्याय विभाग आणि नगर विकास विभाग या तिन्ही विभागांनी महानगरपालिकेच्या रोस्टरचे एक स्वतंत्र युनिट तयार करुन ऑडिट आणि आर्थिक ऑडिट करुन घ्यावे अशा स्वतंत्र युनिटमध्ये आवश्यकता असल्यास त्या कामाचा अनुभव असलेल्या निवृत्त अधिकाऱ्यांचाही विचार करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.
६	**दुसरा अहवाल (सन २००५-२००६)**	जिल्हा परिषदेचा निधी खर्च करताना अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,विमुक्त जाती व भटक्या जमाती या सर्व मागासवर्गीयांसाठी एकत्रित खर्च होत असला तरी त्यातही विमुक्त जाती व भटक्या जमातीसारख्या उपेक्षित घटकाकडे विशेष लक्ष देऊन त्यांच्या उपलब्ध असलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून द्यावा अशी समितीची शिफारस आहे.
७	**तिसरा अहवाल (सन २००७-२००८)**	विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या लोकांच्या विकासाच्या बाबतीत विशेषत्वाने लक्ष देणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेचा निधी खर्च करताना अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,विमुक्त जाती व भटक्या जमाती या सर्व मागसवर्गीयांसाठी एकत्रित खर्च होत असला तरी त्यातही विमुक्त जाती व भटक्या जमातींसारख्या उपेक्षित घटकांकडे विशेष लक्ष देऊन लाभ मिळवून द्यावा,अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.
	बारावा अहवाल (सन २००८-०९)	विमुक्त जाती व भटक्या जमातीचे उमेदवार मिळत नाही अशी अडचण त्या प्रवर्गातील रिक्त पदे भरताना नेहमी उद्भवते विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील मुलांना उच्च शिक्षण देण्यासाठी सामाजिक न्याय विभागाचे अंदाज पंत्रक वाढवून देण्यात यावे.अशी समितीची शिफारस आहे.

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या कार्यपधतीचे नियम

(अंतर्गत कामकाज)

सन १९८१ मध्ये अनुसूचित जाती आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्या विकासासाठी स्वतंत्र समित्या निर्माण करण्याची आवश्यकता वाटल्यमुळे विधानसभा व विधानपरिषद नियमात योग्य तो बदल करण्यात येऊन दिनांक २३ जुलै, १९८१ रोजी विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समिती गठीत करण्यात आली. महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम १९० अन्वये अध्यक्षांनी अनुमोदन दिल्याप्रमाणे, खालील नियम विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीची रचना, तिची व्याप्ती व कामकाज चालविणे यासंबंधी आहेत :-

१. **तपासणीसाठी विषयांची निवड करणे :-** (१) समितीला योग्य वाटतील अशा व तिच्याकडे सापेविलेल्या कामकाजाच्या व्याप्ती खाली येतील अशा विषयांची तपासणी करण्यासाठी समिती त्यांची वेळोवेळी निवड करील.

२. **अभ्यासगटांची नियुक्ती :-** (१) निरनिराळ्या विषयांचा तपशिलावर अभ्यास व तपासणी करण्यासाठी समिती एक किंवा अधिक अभ्यासगट आणि / किंवा उप समित्या वेळोवेळी नियुक्त करील.

(२) अभ्यासगटांची आणि /किंवा उप समित्यांची कामे, इतर गोष्टींबरोबर, खालीलप्रमाणे राहतील :-

(एक) शासनाच्या विभागाकडून मिळालेल्या, किंवा विभागाने पुरविलेल्या साहित्यांचा सखोल अभ्यास करणे.

(दोन) समिती प्रमुखाने मान्यता दिल्यानंतर शासनाच्या विभागाला द्यावयाची प्रश्नावली तयार करणे.

(तीन) शासनाकडून आलेलया उत्तरांची तपासणी करणे व ती विचारात घेणे.

(चार) समितीने किंवा समितीप्रमुखाने पाठविलेलया कोणत्याही प्रकरणाचा अभ्यास करणे व त्यावर अहवाल सादर करणे.

(पाच) अभ्यास दौरे काढणे व त्यावरील अभ्यास टिप्पणी तयार करणे.

(सहा) ज्यांच्या आधारावर अहवालाचे मसुदे तयार करता येतील असे ठळक मुद्दे काढणे.

(सात) अहवालांचे मसुदे संपूर्ण समितीला प्रस्तृत करण्यापूर्वी त्यावर चर्चा करणे.

३. **बैठकीची सूचना :-** समितीच्या बैठकीची तारीख व वेळ समिती प्रमुखांनी निश्चित केल्यानंतर त्या बाबतची सूचना समितीच्या सभासदांकडून प्रस्तृत करण्यात येईल.

४. **समितीचा सादर करावयाचे साहित्य :-** समितीच्या सभासदांच्या उपयोगासाठी आवश्यक असलेल्या साहित्याच्या वीस प्रती १५ दिवसांचे आत सादर करण्याची लेखी विनंती विधामंडळ सचिवालयाकडून शासनाला/विभागाला करण्यात येईल.

५. **सदस्यांना साहित्य प्रसृत करणे. :-** हे साहित्य विधानमंडळ सचिवालयाकडे आल्यानंतर शक्य तितक्या लवकर ते सदस्यांकडे प्रस्तृत करण्यात येईल.

६. **समितीकडे पाठविलेले कागदपत्र गोपनीय समजणे :-** समितीकडे पाठविलेले कागदपत्र गोपनीय समजण्यात येतील व त्यातील मजकूर दुसऱ्या कोणासही कळविण्यात येणार नाही किंवा कोणत्याही विषयावरील अहवाल सभागृहाला सादर करण्याच्या पूर्वी अशा माहितीचा उल्लेख समितीच्या बाहेर कोणत्याही वेळी करण्यात येणार नाही. त्यानंतर सभागृहासमोर ठेवलेल्या कागदपत्रात किंवा अभिलेखांत असलेल्या माहितीचाच फक्त उल्लेख करता येईल.

७. **सदस्यांनी विचारावयाचे प्रश्न :-** (१) कागदपत्र वाचल्यानंतर सदस्यांना ज्या प्रश्नाविषयी किंवा मुद्दयांविषयी अधिक माहिती पाहिजे असेल ते प्रश्न किंवा मुद्दे ते तयार करतील.
(२) समितीप्रमुखांनी निश्चित करावयाच्या तारखेला हे प्रश्न किंवा मुद्दे सदस्यांकडून विधानमंडळ सचिवालयाकडे पाठविण्यात येतील.

८. **शासनासाठी / विभागासाठी प्रश्नावली :-** (१) तपासणी अधीन विषयासंबंधीच्या इतर सुसंगत मुद्यांसह प्रश्न व सदस्यांनी सुचवलेले मुद्दे, प्रश्नावलीच्या स्वरुपात एकत्रित करण्यात येतील. आवश्यक तेथे, स्पष्टीकरणात्मक टिप्पणी जोडून ही प्रश्नावली समितीच्या सर्व सदस्यंकडे प्रस्तृत करण्यात येईल.
(२) अभ्यासगट किंवा उप समिती किंवा समिती या प्रश्नावलींचा आणि सदस्यांकडून आलेल्या सूचनांचा विचार करील. समिती प्रमुखांनी त्यास अनुमोदन दिल्यानंतर ते शासनाकडे/ विभागाकडे पाठविण्यात येतील. त्यानंतर समिती प्रमुखांनी निर्दिष्ट करावयाच्या तारखेला त्या प्रश्नावलीच्या उत्तरांचे २० संच शासन/विभाग विधानमंडळ सचिवालयाकडे सादर करील.
(३) समिती प्रमुखांनी अनुमोदित केलेल्या प्रश्नावलीच्या प्रती समितीच्या सदस्यांकडे प्रस्तृत करण्यात येतील.
(४) शासनाकडून/विभागाकडून आलेली प्रश्नावलीची उत्तरे, ह्या नियमांतील नियम ५ मध्ये विहित केलेल्या पध्दतीनुसार सदस्याकडे प्रस्तृत करण्यात येतील.
(५) एखाद्या मुद्यावर अधिक स्पष्टीकरण आवश्यक असल्यास किंवा जादा माहिती मिळावी असे वाटल्यास ह्या नियमातील पोट-नियम (२) मध्ये विहित केलेल्या पध्दतीनुसार ते मागविता येईल.

९. **तोंडी तपासणीसाठी मुद्दे :-** (१) विधानमंडळ सचिवालय साक्षीदारांच्या तोंडी तपासणीबाबतच्या मुद्यांची आणि/किंवा प्रश्नांची एक यादी तयार करील आणि समिती प्रमुखांच्या अनुमोदनासाठी सदस्यांकडून त्या बाबतीत आलेल्या कोणत्याही सूचना त्यात समाविष्ट करील.
(२) मुद्यांच्या किंवा प्रश्नांच्या याद्यांच्या अग्रिम प्रती समितीच्या सदस्यांकडे प्रस्तृत करण्यात येतील.

१०. तोंडी साक्ष घेण्याची कार्यपध्दती :- (१) प्रथम समिती प्रमुख साक्षीदाराच्या एखादा प्रश्न विचारतील आणि त्यानंतर त्याला प्रश्न विचारण्यासाठी इतर सदस्यांना एकानंतर दुसरा अशा रीतीने बोलावतील. एखाद्या सदस्यांची प्रश्न विचारण्याची इच्छा असल्यास, समिती प्रमुखांच्या परवानगीने ते प्रश्न विचारु शकतील. कोणताही मुद्दा ताबडतोब स्पष्ट करुन सांगण्यासारखी साक्षीदाराची परिस्थिती नसल्यास, त्यानंतर शक्य तितक्या लवकर, विधानमंडळ सचिवालयाकडे लेखी उत्तर करण्याची परवानगी समिती प्रमुखांकडून त्याला मिळू शकेल.
(२) कार्यवाहीचे संबंधित भाग, दुरुस्तीसाठी सदस्यांकडे आणि समितीसमोर साक्ष देणाऱ्या साक्षीदारांकडे पाठविण्यात येतील व ते मिळाल्यानंतर त्यांना अठ्ठेचाळीस तासांच्या आत परत करावे लागतील. कार्यवाहीच्या दुरुस्त केलेल्या प्रती सदस्यांकडून परत मिळाल्या नाहीतर प्रतिवेदकांची प्रत विश्वसनीय समजण्यात येईल. साक्षीदारांकडे पाठविण्यात आलेले कार्यवाहीचे भाग मात्र यांच्याकडे न चुकता परत मिळविले पाहिजेत.

११. अधिक माहिती आवश्यक असलेले मुद्दे :- समितीला ज्या मुद्यांबाबत अधिक माहिती आवश्यक असेल ते मुद्दे विधानमंडळ सचिवालय लिहून घेईल आणि समिती प्रमुखांच्या निदेशानुसार या बाबतीत आवश्क ती कारवाई करील.

१२. साक्षीदारांना परत बोलावणे :- समितीच्या विचाराधीन असलेल्या कोणत्याही मुद्यांवर अधिक पुरावा सादर करण्याकरिता समिती कोणत्याही साक्षीदारास परत बोलावू शकेल.

१३. अभ्यासगटाकडून टिप्पणी आणि साहित्य यांचा समितीला पुरवठा :- अभ्यासगट/उप-समिती आपल्या दौऱ्यातील टिप्पणी, अभ्यासाचे अहवाल आणि इतर अहवाल किंवा कागदपत्र समितीस उपलब्ध करुन देईल.

१४. कागद पत्र सादर करणे :- (१) महाराष्ट्र विधानसभा नियमांत या बाबतीत तरतूद केल्याप्रमाणे समिती एखाद्या विषयाच्या तपासणीसंबंधात आवश्यक असलेल्या व्यक्तींना बोलावील आणि त्यासंबंधीचे कागदपत्र व अभिलेख मागवतील. समितीला आवश्यक असलेले गुप्त कागदपत्र त्यांचा गौप्यस्फोट, राज्याच्या सुरक्षिततेच्या किंवा हिताच्या दृष्टीने हानीकारक असल्याच्या कारणावरुन उपलब्ध करणे शक्य नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र संबंधित मंत्र्यांनी दिले नसल्यास, शासनाला/विभागाला ते गुप्तरीतीने प्रथमतः समिती प्रमुखांना उपलब्ध करुन देता येतील.
(२) समितीच्या सदस्यांना कोणताही गुप्त दस्तऐवज उपलब्ध करुन देण्यापूर्वी समितीप्रमुख शासनाच्या/विभागाच्या इच्छेचा योग्य तो विचार करतील शासन/विभाग आणि समितीप्रमुख यातील कोणताही मतभेद चर्चा करुन मिटविण्यात येईल व कोणताही समाधानकारक समेट न झाल्यास ते प्रकरण त्यानंतर अध्यक्षांसमोर त्यांच्या निर्णयासाठी ठेवण्यात येईल.

१५. **शब्दश: कार्यवृत्त :-** (१) शब्दश: कार्यवृत्त हे फक्त समितीच्या उपयोगासाठी राहील आणि सभागृहासमोर ठेवण्यात आलेले अशा प्रकारचे कागद पत्र केवळ जनतेसाठी खुले राहतील.

(२) संबंध पुरावा किंवा त्याचा कोणताही भाग मुद्रीत करण्याचे समिती ठरवील तेव्हा तो वेगळ्या खंडाच्या स्वरुपात मुद्रित करण्यात येईल आणि हा विषय विचारात घेणाऱ्या समितीच्या अहवालाच्या तो भाग होईल.

१६. **बैठकीचे कार्यवृत्त :-** समितीप्रमुखांच्या अनुमोदनासाठी विधानमंडळ सचिवालय समितीच्या /अभ्यासगटाच्या/उप समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांताचे मसुदे तयार करील.

१७. **कार्यवृत्त प्रसृत करणे :-** समितीच्या प्रत्येक बैठकीचे कार्यवृत्त समितीच्या सदस्यांकडे प्रसृत करण्यात येईल.

१८. **कार्यवृत्त सभागृहासमोर ठेवणे :-** समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त ज्या अहवालासंबंधीचे ते कार्यवृत्त असले तो अहवाल सादर केल्यानंतर शक्य तितक्या लवकर सभागृहासमोर ठेवण्यात येईल.

१९. **अहवालाचा मसुदा तयार करणे :-** (१) एखाद्या विषयाची तपासणी पूर्ण झाल्यासंबंधीचे अभ्यासगट/उप समिती आपले निष्कर्ष व शिफारशी तयार करील व यासाठी एक बैठक बोलविण्यात येईल.

(२) अभ्यासगट/उप समितीच्या निष्कर्षांच्या आणि शिफारशींच्या आधारावर अहवालाचा मसुदा तयार करण्यात येईल आणि अभ्यासगट/उप समितीच्या सदस्यांनी तो विचारात घ्यावा म्हणून त्यांच्याकडे प्रसृत करण्यात येईल.

(३) वरील पोट-नियम (२) अन्वये तयार करण्यात आलेल्या अहवालाच्या मसुद्याला समिती प्रमुखांनी अनुमोदन दिल्यानंतर तो समितीच्या सदस्यांकडू प्रसृत करण्या येईल आणि नंतर समितीच्या बैठकीच्या वेळी विचारात घेण्यात येईल. बैठकीला उपस्थित असलेल्या बहुसंख्य सदस्यांच्या निर्णयांचा समितीचा अहवालात अंतर्भाव राहल.

(४) समितीच्या अहवालात भिन्न मतपत्रिका राहणार नाही.

२०. **अहवालाचे वाटप :-** सभागृहाला अहवाल सादर केल्यानंतर, त्याच्या प्रती शक्य तितक्या लवकर विधानमंडळाचे सदस्य इतर संबंधित व्यक्ती व अधिकारी, इत्यादिकांना उपलब्ध करुन देण्यात येतील.

२१. **शासनाने केलेल्या कारवाईच्या विवरणाची छाननी :-** (१) समितीच्या अहवालात समाविष्ट असलेल्या शिफारशींवर शासनाने केलेली कारवाई दाखविणारे विवरण, योग्य त्या अभिप्रायांसह उप समिती अभ्यासगटासमोर तपासणीसाठी ठेवण्यात येईल आणि त्यानंतर अभ्यासगट/उप समितीच्या/समितीच्या शिफारशींसह ते विवरण समितीप्रमुखांसमोर ठेवण्यात येईल.

(२) अभ्यासगटांच्या/उप समितीने व्यक्त केलेल्या अभिप्रायांच्या आणि समितीप्रमुखांनी काही सूचना

केल्या असल्यास त्या सूचनांच्या आधारावर अहवालांचा एक मसुदा तयार करण्यात येईल. त्यानंतर अहवालाचा हा मसुदा अभ्यासगटाकडून/उप समितीकडून विचारात घेण्यात येईल आणि समितीप्रमुखांनी त्याला अनुमोदन दिल्यानंतर तो समितीकडून स्वीकृतीसाठी पाठविण्यात येईल.

२२. **समितीच्या बैठकींना समितीच्या सदस्यांव्यतिरिक्त इतर व्यक्तींची उपस्थिती :-** समितीचा सभासद नसलेला विधासभेचा सदस्य किंवा विधानपरिषदेचा सदस्य, साक्षी घेण्याचे काम चालू असताना समितीप्रमुखांच्या परवानगीने, समितीच्या बैठकीस उपस्थित राहू शकेल. परंतु समितीचे कामकाज चालू असताना तो उपस्थित राहू शकणार नाही, तथापि, असा सदस्य, कोणत्याही रीतीने समितीच्या कामकाजात भाग घेऊ शकणार नाही किंवा समितीच्या सभासदांच्या बैठकीत तो बसू शकणार नाही.

२३. **कार्यपध्दती संबंधीचे मुद्दे नियमात समाविष्ट करणे :-** या नियमात वेळोवेळी घालण्यात आलेला कोणताही जादा मजकूर किंवा फेरबदल समितीचे रीतसर अनुमोदन मिळाल्यानंतर या नियमात अंतर्भूत करण्यात येईल.

चार

जोडपत्र

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीसंबंधी महाराष्ट्र विधानसभेचे व महाराष्ट्र विधानपरिषदेने स्वीकृत केलेल्या प्रस्तावावरील उतारा :-

(एक) विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या कल्याणसंबंधीच्या राज्य सरकारच्या विविध योजनांची तपासणी करणे आणि राज्य सरकारने त्यांच्या वतीने योजावयाच्या उपाययोजनांसंबंधीची माहिती दोन्ही सभागृहांना देणे.

(दोन) समितीने सुचविलेल्या उपायांवर सरकारने केलेल्या कार्यवाही कारवाईसंबंधीची माहिती दोन्ही सभागृहांना देणे.

(तीन) राज्य सरकारच्या सेवेत व त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या पदांवर (सरकारी प्रक्षेत्रातील उपक्रम तसेच वैधनिक व निमसरकारी संस्थासह) विमुक्त जाती व भटक्या जमातींना योग्य ते प्रतिनिधित्व देण्याकरिता राज्य सरकारने योजलेल्या उपायांची तपासणी करणे.

(चार) राज्य सरकारच्या कक्षेत येणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या कल्याणासंबंधीच्या सर्व बांबीवर सर्वसामान्यपणे विचार करुन त्यासंबंधीचा अहवाल दोन्ही सभागृहांना सादर करणे.

(पाच) सभागृहाने किंवा अध्यक्षांनी तिला विशेषकरुन निर्दिष्ट केलेल्या प्रकरणाची चौकशी करणे.

(१) समितीच्या सदस्यांचा कालावधी प्रथमतः व दुसऱ्यांदा तिच्या पुनर्घटनेच्या तारखेपासून दोन वर्षेपर्यंत आणि त्यानंतर विधानसभा बरखास्त होईपर्यंतचा कालावधी इतका राहील.

(२) इतर सर्व बाबतीत अध्यक्ष ज्याप्रमाणे फेरबदल व फेरफार करतील तदनुसार विधानमंडळ समितीला लागू असलेले या विधानसभेच्या कार्यपध्दतीचे नियम या समितीला लागू होतील.